# मनू सप्तर्षी

ऑफिस सुटल्यावर बसनं घरी परत जाताना मनू सप्तर्षीच्या मनात वारंवार अरविंदचा एकच प्रश्न उपस्थित होत होता –

'आता कशाची आडकाठी आहे मनू !'

प्रश्न विचारताना त्याच्या डोळ्यात गोळा झालेली आर्जवी अपेक्षा मनूला व्याकूळ करून गेली.

'किती प्रतीक्षा करायची अरविंदनं ? अन् का ? त्याचं आपल्यावर निस्सिम प्रेम आहे म्हणून केवळ ?.... असं आहे काय आपल्यात ? सौंदर्य ? बुद्धिमत्ता ? सुडौल शरीर ?

जवळच हातानं धरून ठेवलेल्या कुबड्यांकडे मनूनं पाहिलं.

वेडा !

'वेडा नाहीतर काय ?..... आपल्यासारख्या पांगळ्या सुमार मुलीवर प्रेम करून तिच्या होकाराची वर्षानुवर्षे वाट पहात बसलेल्या अरविंदला दुसरं काय म्हणायचं ?

बालपणीचा खेळगडी अन् मोठेपणाचा जिवलग मित्र म्हणून मनूच्या आयुष्यात त्याचं स्थान होतं हे निश्चित. आणि ती त्याच्यावर प्रीतीही करत होती ह्यात शंकाच नव्हती.

अरविंद होताही तसाच – कुणीही प्रेम करावं असा हळुवार कविहृदयाचा निर्व्याज –

अन् म्हणूनच आपल्या पांगळेपणाबद्दल कीव येऊन तर त्यानं आपल्यावर जीव जडवला नसेल ? वयात आल्यावर मनूला अशी शंका आली. तत्क्षणीच तिनं त्याला तसं स्पष्टच विचारून टाकलं. त्यानं खाडकन तिच्या थोबाडीत मारतली तेव्हा !

'माझ्या निस्सिम प्रेमाचा अपमान करायचाय तुला ?'

रागानं लाल झालेला अरविंदचा चेहरा त्यावेळी मनुला इतका मोहक वाटला की, त्याची भराभर चुंबनं घेत मनु हमसाहमसी रडू लागली होती.

अरविंदला उत्तर आपोआपच मिळालं होतं.

पण प्रश्न पडला होता मनुला –

ह्यातून पुढं काय ?

परिस्थितीच तशी होती. आई, दादा तिच्यावर अवलंबून होते. छोटा ऋषी शिकत होता. तीव्र बुद्धिमत्ता लाभलेल्या ह्या भावाला मोठं करायचं, घडवायचं असे स्वप्न मनूच्या डोळ्यासमोर होते. अन् त्या स्वप्नांचा भार तिला वाहायचा होता. कुटुंबातील कर्ती व्यक्ती म्हणून. ही जबाबदारी लादली म्हणून नव्हे.

खरं म्हणजे तिच्यावर कुणी कधीच काही लादलं नव्हतं.

बालपणी पोलिओच्या आघातानं पांगळं केल्यावरसुद्धा आश्रित म्हणून केविलवाणं जीणं जगण्याचं मनूनं नाकारलं होतं. अगदी पोरवयात –

कुबड्या घेऊन ती शालेय व महाविद्यालयीन जीवनात वावरली समवयस्क मुलामुलींच्या कुचेष्टेत. आईवडिलांच्या विरोधात एकटी ते सारं शिक्षणाच्या बळावर उभं होण्यासाठी. पदवीधर होण्यासाठी.

ती पदवीधर झाली अन् नेमकी त्यावेळी दादांची नोकरी गेली. त्यांच्यावर किटाळ येऊन. निरपराध सरळ मनाचे दादा एकदा जे खचले ते पुन्हा आयुष्यात उठूच शकले नाहीत.

पांगळ्या मनूनं मग हिंमत धरली. ती नोकरी करू लागली. कुटुंबाचा भार तिनं आपल्या शिरावर घेतला. ऋषीचं आयुष्य घडविण्याचा तिनं निर्धार केला.

दादा काहीच बोलले नाहीत. पण आईनं विरोधी सूर काढलाच. आईचं आतडं पोटच्या पोरीची कुचंबणा सहन करू शकत नव्हतं.

आईच्या प्रोत्साहानानं उल्हसित होऊन अरविंदा आपल्याकडे तेव्हा आला होता. किती आशेनं ? किती विश्वासानं ? आईदादांसकट साऱ्यांची जबाबदारी घ्यायला तो तयार होता. त्याच्या दृष्टीनं आता कोणतीच अडचण नव्हती.

त्याला निराश करताना आपल्याला त्यावेळी किती कष्ट झाले होते हे मनूला आताही आठवलं. पण इलाज काय होता ?

मनूवरच्या निरतिशय प्रेमामुळंच तो असं बोलत होता हे काय मनूला कळत नव्हतं. पण नंतर वास्तवाचे चटके बसायला लागल्यावर तो तसाच राहिला असता कशावरून ? आई दादांची आणि ऋषीची अडगळ त्याला पुढे वाटणारच नाही याची काय खात्री होती ? तो आपल्या भावना बोलून दाखवणार नाही हे खरे. पण दडपलेला असंतोष धुमसत राहील. संसार म्हणजे एक उबग



Scanned with OKEN Scanner

आणणारी वाटचाल होईल नुसती.

तेव्हा अरविंदाला मनूनं हे पटवून पाहिलं. पण त्यावेळी तो इतकंच म्हणाला होता – मी वाट बघेन !

त्यानं खरंच वाट पाहिली. ऋषीचं शिक्षण पूर्ण होऊन तो अमेरिकेला नोकरीला गेला. तिथलीच एक मुलगी पटकावून तिच्याशी लग्न केलं. तिथंच स्थायिक झाला. खूप पैसे मिळवू लागला.

इतकी वर्षे अरविंदनं चकार शब्द काढला नाही. अन् आज इतक्या दिवसांनी त्यानं लंच अवरला मनूच्या ऑफिसात येऊन पुन्हा तोच विषय काढला. अन् ती मूक झाली.

'सांगून काही पटलं असतं का त्याला ?'

धक्का देऊन बस थांबली तशी मनू भानावर आली. उतरून घराकडे चालू लागली. तिला आठवलं –

ऋषी अमेरिकेत स्थायिक झाल्यावर त्याने भारतात न येण्याचं पक्कं केलं तेव्हा आईनं तर हायच खाल्ली. बिछाना धरला. दादांनी रागारागानी तोंडसुख घेतलं त्याच्यावर अन् संबंध तोडले. तसं खरमरीत पत्र लिहायलाही ते निघाले होते. पण मनूनंच त्यांना आवरलं, समजावलं. 'त्यांच्या म्हातारपणाची काठी म्हणून मीच' असं मनूनं पटवलं. मनूनं आश्वासलं होतं त्यांना लग्न न करण्याचं वचन देऊन –

दादांना समजावलं, पण आई ?

ती म्हणाली होती, मनू ! अरविंद अजून आशा लावून बसला आहे गं. का त्याला छळतेस ?

पण मनूचा निश्चय कायम होता. अरविंद पुरुष आहे. त्याला चांगली मुलगी मिळेल. माझ्यापेक्षा सुरेख, सुदृढ. पण ह्या थकलेल्या मातापित्यांना कोण ?

घरात शिरली तोपर्यंत मनूचा निर्णय पक्का झालेला होता. ती घरात शिरली अन् सोफ्यावर बसून कॅलीपरचे बंद सोडत तिनं आईला साद घातली. कुणीच घरात नसल्याचं तिला जाणवलं. नवल करीत ती थोडावेळ तशीच बसली. तिच्या येण्याच्या वेळी आई सहसा बाहेर जात नसे.

एवढ्यात आई लगबगीनं आत आली – अतिशय आनंदानं डवरलेला चेहरा अन् हातात पेढे. मनूकडे लक्ष जाताच म्हणाली –

"मनू ! अगं केव्हा आलीस ?.... अगं ! ऋषीला मुलगा झाला. आजच केबल आली. मोठा भाग्याचा दिवस उगवला आज. वंशाचा दिवा लागला. हे गेले आहेत आभिनंदनाची केबल करायला."

मनूला आनंद व्हायला हवा होता. तिनंही ऋषीसाठी खूपच खस्ता खाल्ल्या होत्या. ऋषीचा मुलगा म्हणजे तिचा भाचाच.

पण मनुला कुठेतरी आत दुखावल्यासारखं झालं. तिचं डोकं गरगरू लागलं. ऋषी, त्याची बायको, त्याचा मुलगा इतक्या लांब गेलेली ही माणसं – कधी आई–दादांच्या उपयोगात न पडलेली – उलट मनस्तापासच कारणीभूत झालेली ही नाती.

ही नाती एवढा चमत्कार करू शकतात ? सारं सारं विसरायला लावून उलट अनिर्वचनीय आनंद देऊ शकतात ? उल्हासित करू शकतात ? आणि आपण ?

आपण त्यांना कधी एवढं आनंदित करू शकलो ?..... का नाही ?

दादा ऋषीवरचा राग क्षणात विसरले ? की तो राग म्हणजे समुद्रफेस होता. क्षणात विरणारा....

मनू सप्तर्षीला काहीच कळत नव्हतं. फक्त आपले पाय लुळे पडले आहेत अशी तीव्र जाणीव तिला आयुष्यात प्रथमच होत होती.....

Scanned with OKEN Scanner